# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १८५) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.२१ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## येत्या आठवडाभरात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पावसाची शक्यता

मुंबई दि.२० (प्रतिनिधी)- महाराष्ट्रात विश्रांतीनंतर मान्सून पुन्हा एकदा पूर्ण क्षमतेने सक्रिय झाला आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, येत्या आठवडाभरात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी बरसण्याची शक्यता आहे. उपग्रह छायाचित्रांनुसार, उत्तर, पूर्व आणि ईशान्य भारतात मान्सून अत्यंत सक्रिय स्थितीत असून संपूर्ण महाराष्ट्रावरही ढगांची दाट गर्दी पाहायला मिळत आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, कोकणातील किनारी भाग आणि लगतच्या घाट परिसरात पुढील २ ते ३ दिवस वाऱ्याचा वेग आणि पावसाचा जोर कायम राहील. पुढील २४ तासांत दक्षिण मध्य महाराष्ट्र, कोकण आणि घाट क्षेत्रात काही ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तसेच मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह हलका ते मध्यम, तर विदर्भात काही भागांत मध्यम ते जोरदार पाऊस हजेरी लावू शकतो. हवामान विभागाने राज्यातील विविध जिल्ह्यांसाठी पावसाचा इशारा जारी केला आहे. साताऱ्याच्या घाट क्षेत्रात अतिमुसळधार पावसाची शक्यता असल्याने हवामान खात्याने येथे 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. तर ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि पुण्याचा घाट भाग येथे जोरदार पावसासाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच, तर अमरावती, नागपूर, भंडारा, गोंदिया, संभाजीनगर, अहिल्यानगर, बीड, जालना, परभणी, लातूर, धाराशीव, सोलापूर, सांगली येथे मेघगर्जनेसह पावसासाठी यलो अलर्ट हवामान विभागाने दिला आहे.

# राजधानी दिल्लीत युवकांच्या आंदोलनाचा भडका

### संसदेचे दरवाजे बंद; आंदोलकांवर लाठीचार्ज व अश्रूधूरांचा वापर; दिल्लीत पोलिसांनी डोकी फोडली, करंट दिला, तरुणी सुद्धा रक्तबंबाळ








नवी दिल्ली दि.२० (वृत्तसंस्था)- शिक्षण क्षेत्रातील पेपर फुटीचे गैरप्रकार रोखणे आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या सुटकेच्या मागणीसाठी आज (२० जुलै) देशभरात निदर्शनांचा भडका उडाला. कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) च्या आवाहनानंतर राजधानी दिल्लीतील जंतर-मंतर हे या आंदोलनाचे मुख्य केंद्र बनले. दिल्लीसह महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये आणि लडाखमध्ये या आंदोलनाचे तीव्र पडसाद उमटले. दिल्ली पोलिसांनी आंदोलक विद्यार्थ्यांना अमानुष मारहाण केली. यामध्ये अनेकांची डोकी फोडली गेली. अश्रुधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. देशासह महाराष्ट्रात सुद्धा आंदोलनाचा भडका उडाला. मुंबई, पुण्यासह कोल्हापूर, यवतमाळ, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही विद्यार्थी रस्त्यावर उतरले.

कॉक्रोच जनता पार्टीच्या वतीने आज चलो संसद मोर्चाचे आयोजन केले होते. या आंदोलनात हजारोंच्या संख्येने देशभरातून तरुण दिल्लीत दाखल झाले आहेत. आजपासून सुरु होणाऱ्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी आंदोलनाला परवानगी नाकारली शिवाय जमावबंदीचा आदेश लागू करत जंतर मंतर आणि संसद भवन परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला. पण, पोलिस बंदोबस्ताला न जुमानता आंदोलकांनी संसदेच्या दिशेने मार्च सुरु केला.

मोठ्या संख्येने आंदोलक या मोर्चात सामिल झाले व त्यांनी संसदेच्या दिशेने मार्च करताच पोलिसांनी आंदोलकांना पांगवण्यासाठी सौम्य लाठीचार्च आणि अश्रूधुरांचा वापर केला. मोर्चात सामिल झालेल्या आंदोलकांची संख्या वाढताच पोलिसांनी ठिकठिकाणी बेरिकेट्स आणि पोलिस बंदोबस्त तैनात केला. संसद भवन परिसरात देखील मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. काही आंदोलक संसद भवनाच्या अगदी जवळ पोहोचल्यानंतर याठिकाणी देखील सुरक्षा वाढविण्यात आली आहे. भवन परिसरात लोखंडी बॅरिकेट्स, अग्निशामक दलाचे जवान आणि सुरक्षा जवान तैनात करण्यात आले आहेत.

दिल्ली पोलिसांनी सकाळीच मोर्चाला सुरू होण्यापूर्वी बळाचा वापर करताना अमानुष मारहाण केली होती. त्यानंतर आंदोलकांना करंट सुद्धा दिल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. अनेक आंदोलकांनी (पान ४ वर)

## सोनम वांगचुक यांचा २३ व्या दिवशी उपोषण सुरु ठेवण्याचा निर्धार

कॉकरोच जनता पार्टीकडून नवी दिल्लीत जंतरमंतर ते संसद भवन असा मोर्चा आयोजित करण्यात आला होता. या मोर्चावर पोलिसांकडून लाठीचार्ज करण्यात आल्यानं उपोषण सुरु ठेवणार असल्याचं सोनम वांगचुक यांनी म्हटलं आहे. रुग्णालयातून एका टिशू पेपरवर संदेश लिहून सोनम वांगचुक यांच्या एक्स खात्यावरुन पोस्ट केली आहे. वांगचुक यांनी २३ व्या दिवशी उपोषण सुरु ठेवणार असल्याचं म्हटलं आहे.

सोनम वांगचुक यांनी म्हटलं की उपोषण सुरु ठेवणार आहे. शांततापूर्ण मार्गानं विरोध करणाऱ्या युवकांसोबत ज्या प्रकारे क्रूर पद्धतीनं वागण्यात आलं ते पाहता उपोषण सुरु ठेवत असल्याचं वांगचुक म्हणाले. जोपर्यंत युवकांच्या नेत्यांना संसद भवनात खासदारांना भेटण्याची परवानगी मिळत नाही तोपर्यंत उपोषण सुरु ठेवणार असल्याचं वांगचुक यांनी म्हटलं.

सोनम वांगचुक म्हणाले की मला त्यांना रुग्णालयात भेटण्याची परवानगी आहे. मात्र, सरकारनं प्रथम शिक्षण मंत्र्यांची जबाबदारी निश्चित केली पाहिजे. युवकांना उकसवण्यात आल्यानंतर देखील त्यांना शांतता बाळगली, यामुळं मी खूप प्रभावित झालो आहे. मी सरकार आणि पोलिसांना विनंती करत त्यांनी आज किंवा उद्या संसदेसमोर त्यांच्या तक्रारी मांडण्याची परवानगी द्यावी आणि हा मुद्दा सोडवावा, असं सोनम वांगचुक म्हणाले. युवा आंदोलक आज प्रमाणेच धैर्य आणि सहनशीलता उद्या देखील दाखवतील, असं वांगचुक म्हणाले.

## प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्यांना तुडवले जातेय, लाठीचार्ज केला जातोय; राहुल गांधींचा पंतप्रधानांवर घणाघात!

नवी दिल्ली दि.२० (वृत्तसंस्था)- दिल्लीतील जंतर-मंतरवर 'कॉकरोच जनता पार्टी' आणि विद्यार्थ्यांकडून सुरू असलेल्या तीव्र आंदोलनादरम्यान लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींवर अत्यंत कडक शब्दांत हल्लाबोल केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भारताच्या इतिहासातील सर्वात 'युवक विरोधी' पंतप्रधान आहेत. ते इतके युवक विरोधी आहेत की, संपूर्ण देशात अपयशी ठरलेले शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामासुद्धा घेऊ शकत नाहीत, अशी टीका राहुल गांधी यांनी केली आहे.

शैक्षणिक गोंधळ आणि वारंवार होणाऱ्या पेपरफुटीच्या मुद्द्यांवरून विद्यार्थ्यांनी विचारलेल्या रास्त प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी सरकार त्यांच्यावर लाठीमार करत असल्याचा गंभीर आरोप राहुल गांधी यांनी केला.

सोशल मीडियावर आपल्या भावना व्यक्त करताना राहुल गांधी म्हणाले की, 'देशात आतापर्यंत १५२ पेपर लीक झाले, ७.५ कोटींहून अधिक विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले, मात्र एकाही दोषीला शिक्षा झाली नाही. मग शिक्षा कोणाला मिळाली? (पान ४ वर)

## आंदोलकांनी हे आंदोलन थांबवावे; जे पी नड्डा यांचे आवाहन

नवी दिल्ली दि.२० (वृत्तसंस्था)- नीट पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत गेल्या ३० दिवसांपासून दिल्लीच्या जंतरमंतर मैदानावर सुरु असलेल्या आंदोलनाने आता आक्रमक स्वरुप धारण केले आहे. आज कॉक्रोच जनता पार्टीकडून संसदेवर मोर्चा काढण्याची हाक दिली होती. मात्र, पोलिसांनी काल रात्रीपासून जंतरमंतरवर बॅरिकेडिंग करत अभिजीत दिपके यांच्यासह सर्व आंदोलकांना त्याच ठिकाणी अडकवून ठेवले. मात्र, कॉकरोच जनता पार्टीच्या समर्थकांचा एक वेगळा जमाव संसद भवनाच्या परिसरात पोहोचल्याने पोलीस यंत्रणेची मोठी धावपळ उडाली आहे. यावर केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आंदोलकांनी हे आंदोलन थांबवावं असं आवाहन नड्डा यांनी केलं आहे.

नीट पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणीसाठी सुरु असलेलं आदंलोन आंदोलकांना थांबवाव असं आवाहन जे पी नड्डा यांनी केलं आहे. कॉक्रोच जनता पार्टीच्या शिष्टमंडळासोबत चर्चा झाली आहे. त्यांनी त्यांच्या मागण्या सरकारकडे दिल्या असल्याची माहिती जे पी नड्डा यांनी दिली आहे. शांततापूर्ण चर्चा झाल्याचे माहिती त्यांनी दिली आहे.

आंदोलन मागे घ्यावं, जनजिवन पुर्वरत करण्यासाठी पोलीसांना मदत करावी असे जे पी नड्डा म्हणाले. आंदोलकांकडून सरकारकडे चर्चेचा आज पहिला प्रस्ताव आला आहे. सकाळी ११.५० पासून आमची आंदोलाकांसोबत चर्चा सुरू आहे असे नड्डा म्हणाले. आंदोलकांसोबत बैठक पार पडली आहे. शिष्टमंडळासोबत व्यवस्थीत चर्चा झाली आहे असे नड्डा म्हणाले. आंदोलकांकडुन दुपारी ४ वाजता निवेदन देण्यात आले आहे असे नड्डा म्हणाले.

कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलन आणि पोलिसांचा लाठीमार सुरु असताना दुसऱ्या बाजूला सरकारने आंदोलकांशी चर्चा करण्याचा प्रयत्नही केला. कॉकरोच जनता पार्टीचे प्रवक्ते सौरभ दास यांना जे. पी. नड्डा यांनी चर्चेसाठी बोलावले होते. मात्र, जे.पी. नड्डा यांनी आम्हाला दोन तास वाट पाहायला लावली आणि त्यानंतर फक्त १० मिनिटांची भेट दिली, असे कॉकरोच पार्टीकडून सांगण्यात आले. सीजेपीचे प्रवक्ते सौरभ दास यांनी ट्विट करुन सर्व खासदारांना रस्त्यावर उतरुन आंदोलन करत असलेल्या विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन केले. पोलीस निर्घृणपणे आंदोलन मोडीत काढत आहेत आणि शांततेत आंदोलन करणाऱ्यांना मारत आहे, असेही सौरभ दास यांनी म्हटले.

## सगळी दडपशाही चालली आहे, चर्चेने सहज प्रश्न सुटला असता

### सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली यांचा संताप

नवी दिल्ली दि.२० (वृत्तसंस्था)- सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली आजच्या आंदोलनात सहभागी झाल्या आहेत. त्यांनी या आंदोलनातल्या कारवाईवर प्रतिक्रिया दिली आहे.

शिक्षणाच्या मुद्द्यावर चर्चा व्हावी म्हणून आंदोलन उभं करावं लागतं आहे ही बाब दुर्दैवी आहे. शिवाय प्रत्येक गोष्ट दाबून टाकण्याचा प्रयत्न केला जातो आहे. एवढंच सगळं काही घडलंच नसतं. सगळ्या गोष्टी टाळता आल्या असत्या. पण अशा पद्धतीने आपल्याला हे सगळं सहन करावं लागतं जातं आहे दडपशाही सुरु आहे खरोखर दुर्दैवी स्थिती आली आहे. नीटच्या पेपरफुटीनंतर हे कॉक्रोच जनता पार्टीने धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलन उभं केलं.

या आंदोलनाला सोनम वांगचुक यांनी पाठिंबा दिला आणि २८ जून पासून बेमुदत उपोषण सुरु केलं. आता त्यांच्या पत्नी गीतांजली यादेखील या आंदोलनात सहभागी झाल्या असून सरकार दपडशाही करत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

## अयोध्या राम मंदिर दान घोटाळा: या मुद्द्यावर राजकारण करू नका; सर्वोच्च न्यायालयाची नाराजी

नवी दिल्ली दि.२० (वृत्तसंस्था)- अयोध्येतील श्री रामजन्मभूमी मंदिरात भाविकांनी दिलेल्या देणग्यांमध्ये झालेल्या गैरव्यवहार आणि आर्थिक अनियमिततेच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने सर्वच राजकीय पक्षांना कडक शब्दांत फटकारलं आहे. ''या संवेदनशील मुद्द्यावर कोणीही राजकारण करू नये. हा एका गुन्ह्याशी संबंधित विषय असून याची निष्पक्ष, पारदर्शक आणि योग्य प्रकारे चौकशी करून हे प्रकरण शेवटास नेले पाहिजे,'' अशा स्पष्ट शब्दांत सर्वोच्च न्यायालयानं आपली भूमिका मांडली. प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि चौकशीचा अहवाल वेळेत सादर केला जावा, अशी ताकीद देत न्यायालयानं पुढील सुनावणी २७ जुलै रोजी निश्चित केली आहे.

प्रकरणाची सुनावणी सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जोयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर पार पडली. राम मंदिर ट्रस्टच्या देणग्यांमध्ये झालेल्या घोटाळ्याची सीबीआय चौकशी व्हावी, यासाठी दाखल याचिकांवर सुनावणी सुरू असताना खंडपीठाने हे भाष्य केले.

''आम्ही केवळ सतर्कतेचा इशारा देत आहोत. यात कोणतेही राजकारण आणू नका. याचा तपास पूर्णपणे निष्पक्ष आणि पारदर्शक वातावरणात झाला पाहिजे आणि दोषींवर कारवाई झालीच पाहिजे.'' असे सरन्यायाधिश सूर्य कांत यांनी म्हटले आहे.

उत्तर प्रदेश सरकारनं या प्रकरणाच्या प्राथमिक तपासासाठी विशेष तपास पथक स्थापन केले होतं. यामध्ये लखनऊचे विभागीय आयुक्त विजय विश्वास पंत, पोलीस महानिरीक्षक किरण एस. आणि वित्त विभागाचे विशेष सचिव नील रतन यांचा समावेश होता.

उत्तर प्रदेश सरकार आणि केंद्रातर्फे न्यायालयात बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, '' एसआयटीने प्राथमिक चौकशी पूर्ण केली असून सध्या स्थानिक पोलीस या प्रकरणाचा गुन्हेगारी तपास करत आहेत. आतापर्यंत ८ जणांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून जवळपास ८० लाख रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली आहे.'' यावर न्यायालयाने सुचवले की, ज्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्राथमिक चौकशीत घोटाळा उघडकीस आणला, त्याच तीन सदस्यीय '' ने यापुढील संपूर्ण तपासावरही देखरेख ठेवावी. यावर उत्तर प्रदेश सरकार योग्य ती पावले उचलेल, असे आश्वासन सॉलिसिटर जनरल यांनी दिले. सुनावणीदरम्यान भाविकांनी दिलेल्या दानात पारदर्शकता आणण्यासाठी महत्त्वपूर्ण सूचना करण्यात आल्या. याचिकाकर्त्यांचे वकील देवदत्त कामत यांनी न्यायालयात मागणी केली की, राम मंदिराला मिळणाऱ्या सर्व देणग्या आणि पावत्यांची माहिती अधिकृत संकेतस्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करून दिली पाहिजे, जेणेकरून भाविकांना त्यांनी दिलेली देणगी सुरक्षितपणे पोहोचली आहे का नाही, हे तपासता येईल.

## सरकार पोरांना घाबरलेय, मोर्चा ईडीच्या दिशेने वळवायला हवा-संजय राऊत

मुंबई दि.२० (प्रतिनिधी)- नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ काढण्यात आलेला विद्यार्थ्यांचा संसदेवरील मार्च पोलिसांनी रोखल्यानंतर, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते खासदार संजय राऊत यांनी मोदी सरकारवर अत्यंत जळजळीत शब्दांत टीका केली आहे. '५६ इंच वाल्यांची हातभर फाटलीय, तसेच ईडी आणि सुप्रीम कोर्टासारख्या संस्था मोदी-शाहांच्या गुलाम झाल्या आहेत,' असा गंभीर आरोप संजय राऊत यांनी केला आहे.

विद्यार्थ्यांच्या संसदेवरील मोर्चाला पोलिसांनी परवानगी नाकारल्यानंतर खासदार संजय राऊत यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक अत्यंत आक्रमक पोस्ट करत सरकारवर थेट हल्लाबोल केला आहे. राऊत यांनी आपल्या संपूर्ण पोस्टमध्ये लिहिले आहे की, 'सरकार पोरांना घाबरलेय! शुद्ध मराठीत सांगायचे तर ५६ इंच वाल्यांची हातभार फाटलीय! डरो मत! संसदेवरील मार्चला परवानगी नाकारली; शक्य असते तर जंतर मंतर वरील लाखो लोकांना ईडी लावली असती; पण ते कठीण आहे! मोर्चाचा मार्ग ईडी च्या दिशेने वळवायला हवा! ईडी, सुप्रीम कोर्ट या सारख्या संस्था मोदी शहांच्या गुलाम झाल्या आहेत!' राऊतांच्या या सडेतोड आणि गंभीर आरोपांमुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

संजय राऊत यांनी सरकारवर टीका करताना आंदोलनकर्त्यांची खिल्ली उडवल्याचा आरोप केला. सरकारला वाटलं होतं की, सोनम वांगचुक आणि अभिजित दिपके यांच्यासारख्या आंदोलनकर्त्यांना सहज दडपता येईल. मात्र, हे आंदोलन आता देशभर पसरले असून हजारो तरुण त्याला पाठिंबा देत आहेत, असे ते म्हणाले. सरकार लोकशाहीवादी असते तर संसदेवरील मोर्चाला परवानगी नाकारली नसती आणि आंदोलनकर्त्यांशी संवाद साधून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्याचा निर्णय केला असता, असा दावा राऊत यांनी केला.

## पुण्यात महाविद्यालयीन तरुणीवर चार मित्रांकडून वर्षभर सामूहिक अत्याचार; चौघांना अटक

पुणे दि.२० (प्रतिनिधी)- महिलांवरील तसेच महाविद्यालयीन तरुणींवर लैंगिक अत्याचारांच्या घटना दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. पुण्यातील एका महाविद्यालयीन तरुणीवर चौघांकडून लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे सलग एक वर्ष या तरुणीवर चार मित्रांकडून लैंगिक अत्याचार केल्याचे समोर आले आहे. अश्लील व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत या नराधमांनी तरुणीवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचे समजते. अखेर या त्रासाला कंटाळून तरुणीने वाघोली पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पीडित तरुणीच्या फिर्यादीवरुन वाघोली पोलिसांनी चौघांना अटक केली आहे. फरहान शेख, फजल शेख, रेहान शेख आणि साहिल अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुणी ही पुण्याच्या विमान नगर परिसरात वास्तव्यास आहे. २०२५ मध्ये या तरुणीने पुण्यातील एका नामांकित महाविद्यालयात (पान ४ वर)

## सरकारी कर्मचाऱ्यांवरील हल्ला सहन करणार नाही:दोषींवर कठोर कारवाई करू-चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर दि.२० (प्रतिनिधी)- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सरकारी कर्मचाऱ्यांवरील हल्ल्यांबाबत कठोर इशारा दिला आहे. कर्तव्य बजावत असताना कर्मचाऱ्यांवर होणारे हल्ले कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाहीत, असे ते नागपूर येथील नियोजन भवनात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना म्हणाले. कायदा हातात घेणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पुण्यातील मुद्रांक निरीक्षक मारहाण प्रकरणाचा संदर्भ देत चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, या प्रकरणात दोषींवर गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे. अधिकारी चुकीचे वागत असल्यास तक्रार करण्याची व्यवस्था आहे; मात्र कायदा हातात घेणे खपवून घेतले जाणार नाही. तसेच, संपावर गेल्याने राज्याच्या महसुलाचे नुकसान होत असल्याने मुद्रांक विभागातील कर्मचाऱ्यांनी संपावर जाऊ नये, असे आवाहनही त्यांनी केले.

पक्षाच्या लेटरपॅडच्या वापराबाबत बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजप पदाधिकाऱ्यांना कडक सूचना (पान ४ वर)

# विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार कोण करणार?

एखाद्या शाळेची इमारत बंद झाली, तर त्याची बातमी वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर झळकते. गावात चर्चा रंगते. पालक चिंतेत पडतात. लोकप्रतिनिधी निवेदने देतात. आंदोलने होतात. पण एखाद्या शाळेत गणित, विज्ञान किंवा इंग्रजीचा शिक्षक नसल्यामुळे संपूर्ण वर्षभर विद्यार्थ्यांचे शिक्षण अर्धवट राहते, त्यांची स्वप्ने मावळतात, स्पर्धेतील त्यांची पावले मागे पडतात, याची बातमी मात्र कुठेच दिसत नाही. हीच आजच्या शिक्षण व्यवस्थेची सर्वात मोठी शोकांतिका आहे.आपल्या जिल्ह्यातील शाळांमधील उपलब्ध माहितीनुसार पाचवी ते दहावीपर्यंतच्या वर्गांसाठी जवळपास ७५ ते ८० शिक्षकांची पदे रिक्त आहेत. विशेषतः गणित, विज्ञान आणि इंग्रजीसारख्या मूलभूत विषयांमध्ये शिक्षकांचा गंभीर तुटवडा आहे. या विषयांमध्ये विद्यार्थ्यांचा मजबूत पाया घातला गेला नाही, तर पुढील उच्च शिक्षणात त्यांना मोठी किंमत मोजावी लागते. हे नुकसान केवळ एका वर्षापुरते मर्यादित राहत नाही; ते त्यांच्या संपूर्ण आयुष्यावर परिणाम करणारे ठरते. आज आपण पटसंख्या कमी झाल्यामुळे बंद होणाऱ्या शाळांबद्दल भावनिक चर्चा करीत आहोत. त्या चर्चेची गरज नक्कीच आहे. कारण प्रत्येक शाळा म्हणजे त्या गावाच्या इतिहासाचा, संस्कृतीचा आणि सामाजिक जीवनाचा एक अविभाज्य भाग असतो. त्या इमारतींनी अनेक पिढ्या घडविलेल्या असतात. असंख्य विद्यार्थ्यांची स्वप्ने त्या भिंतींनी पाहिलेली असतात. त्या आठवणींचे महत्त्व कोणीही नाकारू शकत नाही; परंतु या वास्तवाची दुसरी बाजू आपण तेवढ्याच प्रामाणिकपणे पाहण्यास तयार आहोत का?

शाळा बंद झाली म्हणजे शिक्षण बंद होत नाही. त्या शाळेतील विद्यार्थी दुसऱ्या शाळेत प्रवेश घेतात. शिक्षकांचेही समायोजन केले जाते. म्हणजेच शिक्षणाचा प्रवाह सुरूच राहतो. बंद होते ती फक्त एक इमारत. होय, त्या इमारतीशी असलेली भावनिक नाळ तुटते; पण विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत नाही. मात्र रिक्त शिक्षकपदांची परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. इथे इमारत उभी असते. वर्ग भरलेले असतात. विद्यार्थी उपस्थित असतात. पालकांच्या अपेक्षा जिवंत असतात. पण शिकविण्यासाठी विषय शिक्षकच नसतो. वर्गात फळा असतो, बाके असतात, पुस्तके असतात, गणवेशातील विद्यार्थी असतात फक्त शिक्षक नसतो. ही परिस्थिती किती वेदनादायक आहे, याचा विचार आपण कधी केला आहे का? विद्यार्थ्यांना गणित शिकविणारा शिक्षक नाही. विज्ञानातील प्रयोग समजावून सांगणारा शिक्षक नाही. इंग्रजीची भीती दूर करणारा शिक्षक नाही. मग त्या विद्यार्थ्यांचे भविष्य कोण घडवणार? शिक्षक नसलेल्या वर्गातील प्रत्येक दिवस म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील कायमचा गमावलेला दिवस असतो. हा दिवस पुन्हा कधीच परत येत नाही.

आज ग्रामीण भागातील अनेक पालक मोठ्या त्यागाने आपल्या मुलांना शिकवत आहेत. शेतीचे उत्पन्न कमी असले, आर्थिक परिस्थिती बेताची असली तरी ते आपल्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून प्रयत्न करतात. पण शाळेत विषय शिक्षकच नसेल, तर त्या पालकांच्या आशा कोण पूर्ण करणार? शासनाने पटसंख्येच्या निकषांवर काही शाळांचे समायोजन करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामागे आर्थिक, प्रशासकीय आणि व्यवस्थापनाचे काही तर्क असू शकतात. त्यावर स्वतंत्र चर्चा होऊ शकते; परंतु त्याच वेळी ज्या शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त आहेत, त्या विद्यार्थ्यांच्या न्यायाचा प्रश्न अधिक गंभीर आहे.

एका बाजूला आपण रिकाम्या इमारती वाचविण्यासाठी झटत आहोत; तर दुसऱ्या बाजूला शिक्षकांशिवाय चालणारे वर्ग मात्र आपल्या संवेदनांपासून दूर राहिले आहेत. हा विरोधाभास आपल्याला अस्वस्थ करणारा नाही का? गावोगावी उभारलेल्या शाळा या केवळ विटा आणि सिमेंटच्या रचना नाहीत. त्या समाजाच्या स्वप्नांचे स्मारक आहेत. त्या इमारतींमध्ये हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडले आहे. जर त्या इमारतींमध्ये विद्यार्थी कमी झाले असतील, तर त्या इमारती समाजोपयोगी कामांसाठी वापरण्याचे पर्याय नक्कीच शोधता येतील. कौशल्य विकास केंद्र, वाचनालय, प्रशिक्षण केंद्र, डिजिटल शिक्षण केंद्र, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र अशा अनेक उपयुक्त कामांसाठी त्या वापरता येऊ शकतात; परंतु विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील स्वप्ने मात्र कोणत्याही परिस्थितीत बंद पडू देता कामा नयेत.

आजची खरी गरज म्हणजे रिक्त पदांवर तातडीने समायोजन करणे. ज्या शाळांमध्ये अतिरिक्त शिक्षक आहेत, तेथे योग्य नियोजन करून गरजू शाळांमध्ये त्यांची नियुक्ती करणे. यासाठी संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षण विभाग आणि शासन यांनी एकत्र येऊन संवेदनशीलतेने निर्णय घेण्याची गरज आहे. हा प्रश्न कोणाच्या प्रतिष्ठेचा नाही. हा प्रश्न कोणाच्या अधिकाराचा नाही. हा प्रश्न कोणाच्या विजय-पराजयाचा नाही. हा प्रश्न फक्त आणि फक्त विद्यार्थ्यांच्या भविष्याचा आहे. आज आपण घेतलेला प्रत्येक निर्णय पुढील अनेक वर्षांच्या पिढ्यांवर परिणाम करणार आहे. म्हणूनच रिक्त आणि अतिरिक्त या शब्दांमध्ये संघर्ष शोधण्याऐवजी त्यातून उपाय शोधणे अधिक आवश्यक आहे. अतिरिक्त असलेली मनुष्यबळाची क्षमता जिथे गरज आहे तिथे पोहोचली, तर अनेक विद्यार्थ्यांचे आयुष्य उजळू शकते. सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षणप्रेमी नागरिकांना मनापासून एकच विनंती आहे.

या विषयाकडे केवळ प्रशासकीय दृष्टिकोनातून पाहू नका. प्रत्येक रिक्त पदामागे शेकडो विद्यार्थ्यांची स्वप्ने उभी आहेत. प्रत्येक न भरलेल्या जागेमुळे एखादा विद्यार्थी डॉक्टर, अभियंता, वैज्ञानिक, शिक्षक किंवा अधिकारी होण्याची संधी गमावत असू शकतो. शाळा बंद होण्याची वेदना नक्कीच मोठी आहे; पण शिक्षक नसलेल्या शाळेत विद्यार्थ्यांचे भविष्य हळूहळू बंद होत जाते, ही वेदना त्याहूनही मोठी आहे. आज निर्णय इमारतींचा नाहीः. आज निर्णय विद्यार्थ्यांच्या भविष्याचा आहे आणि भविष्याला कुलूप लागण्यापूर्वी आपण सर्वांनी एकत्र येऊन त्याचे दार उघडणे, हीच काळाची सर्वात मोठी गरज आहे.

## वैजापूर-पंढरपूर कायमस्वरूपी बस सेवा मंगळवार (ता.२१)पासून

वैजापूर, दि. २० (प्रतिनिधी) - आ.रमेश पा.बोरनारे तसेच उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब जगताप आणि जेष्ठ नागरिक प्रकाश शेठ बोथरा, धोंडीरामसिंह राजपूत, बबन क्षीरसागर, बापू गावडे, यांच्या मागणी नुसार मंगळवार (ता.२१) रोजी सकाळी ९-३०वाजता आ.रमेश पा. बोरनारे यांच्या हस्ते श्रीफळ फोडून पंढरपूर साठी कायम स्वरूपी बससेवा वैजापूर ते पंढरपूर आरंभ होत असल्याचे येथील आगार प्रमुख किरण धनवटे यांनी धोंडीराम राजपूत यांना कळिवले आहे.शहर व तालुक्यातील नागरिकाना पंढरपूरला जाण्यासाठी ही सोय उपलब्ध करून दिल्या बद्धल आ.बोरनारे यांना प्रवाशी धन्यवाद देत आहेत. उद्या सर्वांनी उपस्थित राहावे, पंढरपूर जाणाऱ्यानी तयारीने यावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना; सुधारणांमुळे वाढली व्याप्ती

**शासनाने** जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची व्याप्ती वाढवण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधीमंडळात केलेल्या भाषणा दरम्यान या योजनेत आणखी काही महत्त्वपूर्ण सुधारणा जाहीर केल्या. यामुळे योजनेची व्याप्ती वाढल्याने शेतकरी सुखावला आहे. ही व्याप्ती वाढल्यामुळे लाभ होणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढणार आहे.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' या योजनेमुळे शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देऊन कर्जमुक्ती देत असतांनाच ग्रामिण अर्थकारणाला गती मिळणार आहे. नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ, उत्पादन खर्चातील वाढ, शेतमालाला मिळणाऱ्या भावातील अनिश्चितता यामुळे उत्पादन व खर्च याचा ताळमेळ न झाल्याने शेती व्यवसायाचे आर्थिक गणित बिघडते. परिणामी शेतकरी आर्थिक अडचणीत सापडतो. अशा परिस्थितीत कर्जमुक्ती योजनेमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.




या योजनेमुळे राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ होणार आहे, हे सर्वश्रृत आहेच. या योजनेत केलेल्या सुधारणांमुळे योजनेतील काही अटी शिथिल करून अधिक शेतकरी या योजनेचा लाभ घेणास पात्र ठरणार आहेत.

**काय केल्या सुधारणा**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेल्या घोषणेनुसार, महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत पूर्वी लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांसाठी असलेली ५० हजार रुपये लाभाची मर्यादा ही अट रद्द करण्यात आली. आता या शेतकऱ्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा संपूर्ण लाभ मिळणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये नवीन कर्ज घेऊन ते वेळेत परतफेड करण्याची अटही रद्द करण्यात आली आहे.

पुर्वीच्या सुचनेनुसार दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकीत कर्ज असलेल्या अनेक शेतकऱ्यांना दोन लाखांपेक्षा जादा रक्कम भरण्याची अटही रद्द करण्यात आली आहे.दोन लाखांपेक्षा अधिक थकबाकी असली, तरी त्यातील दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासनाकडून माफ करण्यात येणार आहे.

**योजनेची अंमलबजावणी**

या योजनेची अंमलबजावणी राष्ट्रीयीकृत बँका, व्यापारी बँका, खासगी बँका तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकां यांच्या मार्फत होत आहे. बँकांकडील पीक कर्जखात्यांच्या माहितीच्या आधारे पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात येत आहे. त्यामुळे लाभार्थी निश्चित करण्याच्या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि अचूकता सुनिश्चित झाली आहे.

**कृषी क्षेत्रासाठी भरीव निधी**

शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देतांनाच शेतीचा वाढता खर्च, वीज, सिंचन, हमीभाव, बाजारपेठ आणि नैसर्गिक संकटे याची जाणीव ठेवून राज्य शासन कृषी क्षेत्रावर दरवर्षी सुमारे ९५ हजार कोटी रुपये खर्च करीत आहे. त्यातच साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या वीजपंपांचे ४८ हजार कोटी रुपयांचे जुने थकीत वीज बिल माफ करणार असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना खुप मोठा दिलासा मिळाला आहे.

**कर्जमुक्ती ते कृषीक्षेत्राची भरारी**

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' या योजनेमुळे शेतकऱ्यांना आत्मविश्वास देणे हे सुद्धा एक महत्त्वाचे उद्दिष्ट साध्य होणार आहे. त्यामुळे कृषी अर्थव्यवस्थेला बळकटी देणे, हा या योजनेमागील व्यापक दृष्टिकोन आहे.

शेतकरी हित जोपासणारे राज्यकर्ते छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, शाहू महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ध्येयधोरणांचा अवलंब विद्यमान शासन करतांना दिसत असून शेतकऱ्यांची समृद्धी हेच शासनाचे उद्दिष्ट असल्याचे शासनाने अधोरेखीत केले आहे.

संकलन- जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

# कर्जाची परतफेड नाही झाली तर बँक काय करेल

**माणसाला** पैशाची गरज भासली की, तो बँकाकडुन कर्ज घेतो. व त्या कर्जाची फेड निर्धारीत वेळेत करणे आवश्यक असते. परंतु काही अडी अडचणीमुळे कर्जदाराला घेतलेल्या कर्जाची परतफेड वेळेवर करु शकत नाही. तसेच देशाच्या आर्थिक आणि सामाजिक कल्याणात बँकाना खुप महत्वाचे स्थान आहे. कारण की, देशातील आर्थिक प्रगतीचा कणा म्हणजे बँक होय. हा कणा सातत्याने कार्यक्षम ठेवायचा असेल तर, कर्जदारांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड ही अगदी वेळेवर केली पाहिजे. परंतु प्रत्यक्षात कधी कधी असे होत नाही. त्यामुळे देशातील सर्वच बँका पुढे कर्ज वसुली हा एक खुप मोठा चिंतेचा विषय आहे.

थकीत कर्जाची वसुली करताना शासनाचे नियम कायद्यातील पळवाटा न कळतपणे झालेला राजकीय हस्तक्षेप इत्यादी विविध कारणांनी बँकाची सर्वाधिक शक्ती ही बँकींग व्यवसायाची वाढ करण्यापेक्षा थकीत कर्ज वसुली करण्यातच त्यांचा अधिक वेळ व श्रम व पैसे वाया जातात. व त्याचा परिणाम बँकाच्या आर्थक क्षमतेवर (नफा) मोठा होत असतो. त्यामुळे कळत नकळतपणे बँकाचे उत्पन्न हे दिवसेंदिवस एन.पी.ए वाढल्यामुळे कमी होते

बँकींग व्यवसायावर होत असलेल्या या परिणामांचा सर्वांगीन विचार करुन रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया आणि सहकार आयुक्त यांनी बँकाना खर्चाचे प्रमाण कती करुन आवश्यक तेथे काटकसर करण्याचे सुचवलेले आहे. शिवाय आर्थिक व्यवहारावर होणाऱ्या परिणामामुळे बँकाची आर्थिक स्थिती मजबुत टिकवणे, थकीत

कर्जाची वसुली करणे दिवसेंकदिवस अवघड होत आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाच्या मानका प्रमाणे बँकेने सर्व सारासार परिस्थितीचा विचार करता विविध कायद्याचे व वसुली नियमाची अद्यवत माहिती तात्काळ उपलब्ध करून घेऊन बँकेतील सर्वच कर्मचाऱ्यांना बँकींग लॉ या विषयात तज्ञ असलेल्या व्यक्तीद्वारे त्यांना प्रशिक्षण देणे वेळ प्रसंगी अशा तज्ञांचे मार्गदर्शण घेणे व थकीत कर्जदारा कडुन कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून थकीत कर्ज वसुल करणे आवश्यक आहे. त्याकरीता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नियम १९६१ अंतर्गत कलम १०१ प्रमाणे कर्ज वसुली प्रमाणपत्र व १५६ व नियम १०७ नुसार किंवा सेक्युटायरेशन ॲक्ट २००२ अंतर्गत वसुली कार्यवाही करण्यासाठी कार्पोरेट बँकींग लॉ तज्ञ असलेल्या वकीला मार्फत थकीत कर्जदारांना व त्यांचे जामीनदार यांना निर्धारीत वेळेत नोटीसा पाठवणे अत्यंत आवश्यक आहे. सदर नोटीसीला थकीत कर्जदारा कडुन प्रतिसाद प्राप्त होत नसल्यास, थकीत कर्ज वसुल होत नसल्यास बँकाना खालील प्रमाणे कायदेशीर कार्यवाही द्वारे थकीत कर्जाची वसुली करता येते.

सदर नोटीसा पाठवल्यानंतर थकीत कर्ज वसुल होत नसल्यास किंवा थकीत कर्जदार हा विविध सबबी सांगुन थकीत कर्ज देण्याचे टाळत असल्यास अशा वेळी बँक ही सर्फेशी ॲक्ट २००२ अंतर्गत तरतुदी आणि कार्यपद्धतीचा अवलंब करून मा. न्यायालयाच्या हस्तक्षेपा शिवाय थकीत कर्ज वसुल करणे शक्य व्हावे, या धेय धोरणांनी देशात सर्फेश ॲक्ट २००२ हा कायदा अस्तित्वा आला. आणि हा कायदा सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीकृत बँका बरोबर नागरी सहकारी बँका व इतर बँकानाही भारतभर लागु केलेला आहे. बँका या कायद्याचा लाभ घेऊन थकीत कर्जाची वसुली करु शकतात. सदर कायद्याच्या अवलंब करताना बँका हया विषयातील तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली

१) कर्जदार व जामीनदार यांना निर्धारीत वेळे नोटीसा पाठवणे,

२) जिल्हा उपनिबंधकाकडे / सक्षम अधिकाऱ्या कडे प्रस्ताव दाखल करणे

३) जिल्हा उपनिबंधक / सक्षम अधिकारी यांचे कडुन वसुली प्रमाणपत्र मिळवणे

४) जंगम जप्तीची कार्यवाही करणे (दोन प्रकारे)

५) जप्त केलेली मालमत्ता बँकेच्या ताब्यात घेणे

६) प्रस्ताव असल्यास ओटीएस करणे

७) अपसेट प्राईजला मान्यता मिळवणे.

८) जप्त मालमत्तेची लिलावाणे विक्री प्रक्रिया पार पडणे

९) सेक्युटरायजेन ॲक्ट २००२ अंतर्गत कायद्याच्या तरतुदी नुसार वसुली प्रक्रिया पार पाडणे

१०) लिलावाची रक्कम लिलावाच्या खर्चासह वसुल करुन कर्ज खाती जमा झाल्यावर कायद्या नुसार रजिष्ट्रेशन करुन देणे

११) सदर प्रक्रिया पार पाडत असताना वसुली कार्यवाही प्रसंगी कर्जदार जामीनदार हजर राहत नसल्यास, बँकेकडे नोंदणीकृत गहाणखत नसल्यास अशा वेळी योग्य त्या प्रकारे विषय हाताळणे व थकीत कर्ज वसुली करणे या संदर्भात या विषयातील तज्ञ ॲड. कार्पोरेट कायदा सल्लागार यांनी थकीत कर्ज वसुली संदर्भात बँक काय करु शकेल या विषयावर सविस्तर माहिती देणारे मराठी भाषेतील पुस्तक सर्फेशी ॲक्ट २००२ या पुस्तकाचे लिखाण केले आहे. सदर पुस्तकात श्री निलंगेकर यांनी सर्फेशी ॲक्ट २००२ मधील विविध व्याख्या, कायदयातील प्रभावी तरतुदी, विविध कलमे, जप्ती ताबा, मालमत्तेचे हस्तांतरण, थकीत कर्जदाराचे व बँकाचे अधिकार हक्क महत्वपुर्ण न्यायनिवाडे, अंमलबजावणी करण्याची पद्धत, राजपत्र, विविध परिपत्रके इत्यादी विषयाचे सखोल लेखन अगदी साध्या व सोप्या मराठी भाषते लिहीले आहे.

कायद्यासारखा रुक्ष व कंटाळवाणा विषय अगदी सोपा करुन सांगीतलेला आहे. पुस्तकांच्या शेवटी प्रश्नोत्तर रुपाने काही महत्वपुर्ण प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिलेली आहेत. याशिवाय सदर कायद्याची अंमलबजावणी करताना अडचणी येऊ नयेत यासाठी काही सत्य अनुभव दिलेले आहेत. आज या कायद्यावरती इंग्रजी भाषेतुन बरीचशी पुस्तके उपलब्ध आहे. परंतु मराठी भाषेतील हे पुस्तक संग्राहय ठेवण्या सारखे आहे. ज्यांनी ज्यांनी कर्ज घेतले आहे, व वेळेवर कर्जाची परतफेड होत नसेल त्यांच्यासाठी बँक काय करु शकते या विषयावर हे पुस्तक मार्गदर्शन करणारे आहे.

श्री श्री जोशी निलंगेकर यांनी बँकेत उच्च पदावर वरिष्ठ विधी विभागाची जबाबदारी सांभाळुन व अनुभव घेऊन लिहीलेले हे पुस्तक केवळ थकीत कर्जदार, बँकेत काम करणारे कर्मचारी, अधिकारी, वसुली विभागातील कर्मचारी संचालक, व्यवस्थपक शिवाय ज्यांना या विषयात आवड असुन करीअर करण्याची ईच्छा त्यांना हे एक अत्यंत असे उपयुक्त पुस्त आहे. हे पुसतक लिहीण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम हे कौतुकास्पद आहेत. सद्य स्थितीत बँकींग क्षेत्रात बँकींग लॉ तज्ञांची व बँकींग लौ विषयावर लिखाण करणाऱ्या लेखकांची कमतरता आहे. असे म्हटल्यास अतिशोक्ती होणार नाही. ही कमतरता श्री जोशी निलंगेकर यांनी भरुन काढण्याचा प्रयत्न केलेला आहे..

या पुस्तकास मा. महेशचंद्र गणपतराव कवठेकर (सहकार रत्न) हे ३५ वर्षाहुन अधिक काळ बँकेत कार्य केलेले मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री उत्तम बाबुराव जोशी (शाखा व्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ इंडीया, परळी) यांचे शुभ संदेश व सेंट्रल बैंक ऑफ इंडीया यांचे मा. चिफ अधिकारी श्री श्रीधर नागनुर, पुणे व मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठातील प्रसिद्ध ॲड. गौरव लक्ष्मीकांतराव देशपांडे (रुईकर) यांचा अभिप्राय लाभलेला असुन मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यां खंडपीठातील जेष्ठ कौंसील ॲड. राजेंद्र सुधाकरराव देशमुख यांची प्रस्तावना व मराठवाडा नागरी सहकारी बँक असोशिएशनचे स्व. श्री सुभाष राज वैद्यजी यांचाही अभिप्राय लाभलेला आहे.

श्री श्री जोशी निलंगेकर यांनी राजीव गांधी नॅशनल लॉ युनिर्व्हसिटी, पंजाब आणि महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिर्व्हसिटी, नागपुर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेला बँकींग लॉ हा अभ्यासक्रम यशस्वीरित्या प्रथम श्रेणीत पुर्ण केलेला आहे. शिवाय बँकेत विधी / वसुली विभागात २१ वर्षाहुन अधिक काळ प्रत्यक्ष थकीत कर्ज वसुली व न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांचेकडे आहे. सद्य स्थितीत ते कार्पोरेट कायदा सल्लागार म्हणुन विधीयोद्धा लॉ फर्म, मुंबई येथे कार्यरत आहेत.

कर्जाची परतफेड नाही झाली तर बँक काय करेल. (सर्फेशी ॲक्ट २००२ तरतुदी आणि कार्यपद्धती पुस्तक मुल्य २९५/- + पोस्टेज) संपर्क मो. ८८८८४८१२५९

# दिल्ली पेटली, विद्यार्थी रस्त्यावर; सरकार अजूनही शांत?

देशाच्या भवितव्याचा पाया जर शिक्षण असेल, तर त्या शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास हा राष्ट्राच्या प्रगतीचा आत्मा असतो. पण जेव्हा स्पर्धा परीक्षांचे प्रश्नपत्रिकाच पैशाच्या जोरावर बाजारात विकले जातात, तेव्हा केवळ एखादी परीक्षा भ्रष्ट होत नाही, तर लाखो विद्यार्थ्यांची स्वप्ने, पालकांचा विश्वास आणि देशाच्या भविष्यावरील आशाही हादरते. नीट पेपरफुटी प्रकरणाने देशभरात निर्माण झालेला संताप हा केवळ एका परीक्षेपुरता मर्यादित राहिलेला नाही. तर तो आज संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा राष्ट्रीय विषय बनला आहे. हजारो विद्यार्थी दिल्लीतील जंतर-मंतरवर उतरले आहेत. त्यांच्या मागण्या राजकीय नसून, उत्तरदायित्व, न्याय आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत, एवढ्याच आहेत.



या आंदोलनाला नवे स्वरूप मिळाले ते प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांच्या सहभागामुळे. २८ जून पासून त्यांनी उपोषण सुरू केले. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत गेल्यानंतर न्यायालयाच्या निर्देशांनुसार त्यांना रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र आंदोलन थांबले नाही. उलट त्याची नैतिक ताकद अधिक वाढली. त्यानंतर सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी उपोषणाची धुरा स्वीकारली आहे. लोकशाहीत आंदोलन हा संविधानाने दिलेला अधिकार आहे. शासनाला विरोध करणे म्हणजे राष्ट्रविरोध नव्हे. उलट शासनाचे लक्ष जनतेच्या प्रश्नांकडे वेधण्याचा तो लोकशाही मार्ग आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे आंदोलन दडपण्यापेक्षा त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणे ही लोकशाहीची खरी कसोटी असते.

आज देशातील लाखो विद्यार्थी एका प्रश्नाचे उत्तर शोधत आहेत. जर मेहनत, प्रामाणिकपणा आणि गुणवत्ता यांना प्रश्नपत्रिका माफियांसमोर पराभूत व्हावे लागणार असेल, तर अभ्यास करण्याचा अर्थ काय? हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. कारण एका विद्यार्थ्याचे वर्ष वाया जाणे म्हणजे केवळ त्याचे वैयक्तिक नुकसान नसते, तर त्या कुटुंबाच्या आर्थिक, मानसिक आणि सामाजिक आयुष्यावर त्याचे दूरगामी परिणाम होतात. या आंदोलनाला विविध विरोधी पक्षांनी पाठिंबा दिला आहे. राहुल गांधी, उद्धव ठाकरे, चंद्रशेखर आझाद यांच्यासह अनेक नेत्यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सरकारने संवाद साधावा, अशी भूमिका घेतली आहे. मात्र कोणत्याही आंदोलनाला राजकीय पाठिंबा मिळाला म्हणून त्या आंदोलनातील मूळ प्रश्न गौण होत नाही. उलट शासनाने त्या प्रश्नाचा अधिक गांभीर्याने विचार करण्याची गरज निर्माण होते.

सोनम वांगचुक यांची प्रकृती खालावत असतानाही त्यांनी आंदोलन मागे घेतले नाही. तथापि, या संपूर्ण प्रकरणात एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवावी लागेल. कोणत्याही तपासाआधी दोषारोप करणे योग्य नाही. दोषींवर कठोर कारवाई व्हावी, ही विद्यार्थ्यांची अपेक्षा रास्त आहे. पण ती कारवाई कायद्याच्या चौकटीत, निष्पक्ष तपासानंतरच व्हावी, ही लोकशाहीची मूलभूत अट आहे. सरकारवर उत्तरदायित्व आहे, तसेच तपास यंत्रणांवर निष्पक्षतेची जबाबदारीही तितकीच आहे.

आज विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेला अविश्वास हा सर्वात मोठा धोका आहे. स्पर्धा परीक्षा म्हणजे गुणवत्तेची स्पर्धा राहिली नाही, तर पैशांची स्पर्धा झाली, अशी भावना समाजात निर्माण झाली तर देशाची गुणवत्ता आधारित व्यवस्था कोलमडू शकते. उद्याचे डॉक्टर, अभियंते, वैज्ञानिक, प्रशासकीय अधिकारी आणि न्यायाधीश हेच विद्यार्थी आहेत. त्यांचा आत्मविश्वास ढासळणे म्हणजे देशाच्या भविष्याची पायाभरणी कमकुवत होणे होय. सरकारने या आंदोलनाकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नाप्रमाणे न पाहता, राष्ट्रीय शिक्षणव्यवस्थेवरील विश्वास पुनर्स्थापित करण्याची संधी म्हणून पाहिले पाहिजे. दोषींना कठोर शिक्षा, परीक्षा प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पेपरफुटी रोखण्यासाठी स्वतंत्र आणि पारदर्शक यंत्रणा, तसेच विद्यार्थ्यांशी थेट संवाद, ही चार पावले तातडीने उचलली गेली तर परिस्थिती बदलू शकते.

लोकशाहीत सरकारची ताकद विरोध दडपण्यात नसते, तर विरोध ऐकून त्यावर उत्तर देण्यात असते. संसद हे जनतेच्या प्रश्नांचे मंदिर मानले जाते. त्यामुळे २० जुलैचा प्रस्तावित संसद मोर्चा केवळ आंदोलन नसून, शासन आणि विद्यार्थ्यांमधील विश्वासाची परीक्षा ठरणार आहे. आज देशातील प्रत्येक पालक, प्रत्येक विद्यार्थी आणि प्रत्येक जागरूक नागरिक एका उत्तराची वाट पाहत आहे. या देशात प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित आहे का? या प्रश्नाचे उत्तर घोषणांमध्ये नाही, तर कृतीत दडलेले आहे. कारण प्रश्नपत्रिका फुटली की फक्त एक परीक्षा रद्द होत नाही, तर न्याय, समान संधी आणि संविधानातील समानतेच्या तत्त्वावरही प्रश्नचिन्ह उभे राहते.

देशाला आंदोलन नको आहे, देशाला विश्वास हवा आहे. विद्यार्थ्यांना संघर्ष नको आहे, त्यांना न्याय हवा आहे आणि शासनानेही हे लक्षात ठेवले पाहिजे की, राष्ट्राची खरी उभारणी संसदेच्या भिंतींवर नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या मनातील विश्वासावर उभी असते.

**- प्रवीण बागडे**

# वैजापूरात माजी सैनिकांनी केले वृक्षारोपण



वैजापूर, दि. २० (प्रतिनिधी) – येथील ऑल इंडिया सेंट्रल पॅरॅमिल्ट्री फोर्सेस वेलफेअर असोसिएशनच्या वतीने हुतात्मा जगन्नाथ भालेराव स्मारकात वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला.माजी नगराध्यक्षा शिल्पाताई परदेशी तसेच असोसिएशनचे दिल्ली येथून आलेले अध्यक्ष एच. आर.सिंग, महासचिव रणबीरसिंग, अर्ध सैनिक कल्याण बोर्डचे अध्यक्ष अशोक संगेवार, वैजापूरचे अध्यक्ष श्री. देवकर, महासचिव गौतम गायकवाड, नगरसेवक दशरथ बनकर, सामाजिक कार्यकर्ते तथा सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत, सुमनबाई गायकवाड, सीताबाई गायकवाड, किशोर पाटील यांच्या सह माजी सैनिक व कार्यरत सैनिक तसेच शहरातिल नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. ही लावलेली झाडे जगविण्याचा व त्यांचे संरक्षण करण्याचा संकल्प ही करण्यात आला.

# परमपूज्य आचार्य श्री विनम्रसागर महाराज ससंघ यांचे छत्रपती संभाजीनगर येथे भव्य मंगल आगमन

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ जुलै २०२६ : परमपूज्य समाधिस्थ आचार्य श्री विरागसागर महाराज यांचे परम प्रभावक शिष्य, आचार्य श्री १०८ विनम्रसागर महाराज ससंघ (१९ साधू व आर्यिका माताजी) यांचे चातुर्मासासाठी आज सकाळी छत्रपती संभाजीनगर येथे भव्य व ऐतिहासिक मंगल आगमन झाले. राजाबाजार येथील श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिरात त्यांच्या पावन आगमनावेळी सकल दिगंबर जैन समाजाने अत्यंत श्रद्धा, भक्ती आणि उत्साहपूर्ण वातावरणात त्यांचे भव्य स्वागत केले.

सकाळी ७.३० वाजता युगप्रवर्तक आदिनाथ दिगंबर जैन मंदिर, अरिहंत नगर येथून भव्य शोभायात्रेला प्रारंभ झाला. धर्मध्वज, नवकार महामंत्राचा जयघोष, भजन–कीर्तन आणि हजारो भाविकांच्या उपस्थितीत ही शोभायात्रा बालाजी नगर, मोंढा नाका, लक्ष्मण चौक, अभिनय थिएटर मार्ग, किराणा चावडी मार्गे राजाबाजार येथील श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिरात दाखल झाली. संपूर्ण मार्गावर विविध सामाजिक व धार्मिक संस्थांनी तसेच समाजबांधवांनी पुष्पवृष्टी, मंगल आरती आणि जयघोष करून आचार्य



श्रींचे भावपूर्ण स्वागत केले.

आचार्य श्री विनम्रसागर महाराजांच्या चातुर्मास आगमनामुळे संपूर्ण छत्रपती संभाजीनगरचे वातावरण धर्ममय, भक्तिमय आणि उत्साहपूर्ण झाले. अनेक वर्षांनंतर शहराला आचार्य ससंघांचा चातुर्मास लाभल्याने समाजात आनंद, उत्साह आणि आध्यात्मिक जागृतीचे वातावरण निर्माण झाले. महिला, पुरुष, युवक, युवती तसेच बालकांनी मोठ्या संख्येने शोभायात्रेत सहभागी होत गुरु भक्ती, शिस्त आणि समाजातील एकतेचे प्रेरणादायी दर्शन घडविले.

यावेळी आपल्या मंगल प्रवचनात आचार्य श्री विनम्रसागर महाराज म्हणाले, ‘उद्यावर ढकलत कोणतेही चांगले कार्य करू नका. जे श्रेष्ठ कार्य करायचे आहे ते आजच करा. वेळ अमूल्य आहे. त्याचा सदुपयोग धर्म, आराधना आणि सेवेसाठी करा.‘ त्यांनी छत्रपती संभाजीनगरातील समाजाच्या गुरु भक्ती, समर्पण आणि संघटनभावनेचे मनापासून कौतुक करत सांगितले की, ‘येथील समाजाची गुरु भक्ती अत्यंत प्रेरणादायी आहे. आपण सर्वांनी याच भावनेने धर्मकार्य करत राहावे, भगवानाची आराधना, गुरु भक्ती आणि आत्मकल्याणाच्या मार्गावर निरंतर पुढे जात राहावे. हाच जीवनाचा खरा लाभ आहे.‘

समाजातील ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, चातुर्मास हा केवळ धार्मिक सोहळा नसून आत्मकल्याण, संयम, संस्कार, सामाजिक समरसता आणि धर्मप्रभावनेचा महोत्सव आहे. पुढील चार महिन्यांत गुरुदेवांच्या सान्निध्यात प्रवचने, स्वाध्याय, तप, आराधना, संस्कार शिबिरे तसेच विविध धार्मिक कार्यक्रम ांचे आयोजन करण्यात येणार असून, त्यातून नव्या पिढीला धर्म व संस्कृतीशी जोडण्याची अमूल्य संधी मिळणार आहे.

समारोपावेळी विनम्र चातुर्मास–२०२६ संयोजन समिती तसेच सकल दिगंबर जैन समाजाने सर्व श्रद्धाळू, संस्था आणि सहकार्य करणाऱ्या समाजबांधवांचे आभार मानले. तसेच चातुर्मासातील सर्व कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून धर्मलाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. छत्रपती संभाजीनगरच्या धार्मिक इतिहासातील हा एक सुवर्ण आणि अविस्मरणीय अध्याय ठरणार असून, गुरुदेवांच्या सान्निध्यात पुढील चार महिन्यांचा अधिकाधिक आध्यात्मिक लाभ घेण्याचा संकल्प समाजाने व्यक्त केला.

# शिष्यवृत्तीचा घोटाळा थेट न्यायालयात; विद्यार्थ्यांवर फौजदारी कारवाईचे आदेश!

छत्रपती संभाजीनगर, दि. २० (प्रतिनिधी) – शासकीय शिष्यवृत्ती ही विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी असते, वैयक्तिक खर्चासाठी नव्हे, असा स्पष्ट आणि कठोर संदेश देणारा महत्त्वपूर्ण आदेश प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने दिला आहे.

बीड बायपास परिसरातील एका इंजिनिअरिंग महाविद्यालयातील चार विद्यार्थ्यांनी शासनाकडून मिळालेली ६० हजार, ६० हजार, रू. ८० हजार आणि रू.८० हजार इतकी शिष्यवृत्तीची रक्कम महाविद्यालयात शुल्क म्हणून जमा न करता स्वतःच्या वैयक्तिक कारणांसाठी वापरल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी न्यायालयाने संबंधित विद्यार्थ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम ३१६(२), ३१८, ६१(२) व ३(५) अंतर्गत नियमित फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले असून, सातारा पोलीस ठाण्याला गुन्हा नोंदविण्याचे निर्देश दिले आहेत.

# ‘अॅल्युमिनियम भारत–२०२६’ उपक्रमाची घोषणा; गांधीनगर येथे भरणार प्रदर्शन

मुंबई, दि. २१ (प्रतिनिधी) – अॅल्युमिनियम एक्सट्रुजन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडियाने (अलेमाई) मूल्यवर्धित अॅल्युमिनियम मिडस्ट्रीम आणि डाउनस्ट्रीम उत्पादन परिसंस्थेला बळकटी देण्यासाठी ‘अॅल्युमिनियम भारत–२०२६’ या राष्ट्रीय उपक्रमाची घोषणा केली आहे. केंद्र सरकारच्या आत्मनिर्भर भारत आणि विकसित भारत या संकल्पनांना बळ देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. गांधीनगर येथे हा उपक्रम होणार असल्याची माहिती येथे पत्रकार परिषदेत देण्यात आली.

देशात मोठ्या प्रमाणावर बॉक्साइटचे साठे असून, अॅल्युमिना उत्पादन करणाऱ्या अग्रगण्य देशांमध्ये भारताचा समावेश होतो. त्यामुळे अॅल्युमिनियम उत्पादन क्षेत्रात भारताला नैसर्गिक स्पर्धात्मक लाभ प्राप्त आहे. मोठ्या प्रमाणात कच्चा माल उपलब्ध असूनही सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना प्राथमिक आणि दुय्यम अॅल्युमिनियम कच्चा माल इतर देशांच्या तुलनेत जास्त किमतीत खरेदी करावा लागत आहे. चढे व्याजदर, ऊर्जा खर्च आणि विविध करांमुळे कच्च्या मालाचा खर्च वाढत असल्याचे अलेमाईकडून सांगण्यात आले. या पार्श्वभूमीवर २६ ते २९ सप्टेंबर या कालावधीत गुजरातमधील गांधीनगर (अहमदाबाद) येथील हेलिपॅड एक्झिबिशन सेंटरमध्ये ‘अॅल्युमिनियम भारत–२०२६’ आणि ‘अल्युमेक्स इंडिया–२०२६’ या प्रदर्शनांचे आयोजन करण्यात आले आहे.

संपूर्ण अॅल्युमिनियम मूल्य साखळीला एकाच व्यासपीठावर आणणारा देशातला हा पहिलाच व्यापक उपक्रम ठरणार आहे. प्रदर्शनात प्राथमिक अॅल्युमिनियम उत्पादक, एक्सट्रुजन व रोलिंग उद्योग, पुनर्वापर क्षेत्रातील कंपन्या, तंत्रज्ञान व यंत्रसामग्री पुरवठादार, धोरणकर्ते, वित्तीय संस्था आणि जागतिक खरेदीदार सहभागी होणार आहेत. डाउनस्ट्रीम उद्योगाची क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक सुधारणा, गुंतवणूक आणि सहकार्य यावर या व्यासपीठावर चर्चा होणार आहे.

भारताने प्राथमिक धातूच्या निर्यातीऐवजी मूल्यवर्धित अॅल्युमिनियम उत्पादने आणि प्रगत डाउनस्ट्रीम उत्पादन उद्योगाला प्राधान्य देणारे धोरण स्वीकारण्याची आवश्यकता आहे. ऊर्जा आणि वित्त पुरवठ्याचा खर्च कमी करून अॅल्युमिनियम एमएसएमई उद्योगांना जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनविणे. देशातील तीन दशलक्ष टन एक्सट्रुजन क्षमतेचा पूर्ण वापर होण्यासाठी मूल्यवर्धित अॅल्युमिनियम उत्पादनांच्या देशांतर्गत वापराला प्रोत्साहन देणे.

केवळ प्राथमिक धातूच्या निर्यातीऐवजी उच्च मूल्यवर्धित डाउनस्ट्रीम उत्पादनांच्या निर्यातीवर भर देणाऱ्या जागतिक प्रवाहाशी भारताचे अॅल्युमिनियम धोरण सुसंगत करणे आवश्यक ठरले असल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग २७ मध्ये १० हजार वृक्षारोपणाचा संकल्प

## २२ ते २८ जुलैदरम्यान वृक्षारोपण सप्ताह; नागरिकांना उत्स्फूर्त सहभागाचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. २० (प्रतिनिधी) – राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्रमांक २७ मध्ये २२ ते २८ जुलै या कालावधीत भव्य वृक्षारोपण सप्ताह राबविण्यात येणार असून, संपूर्ण प्रभागात १० हजार वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. मुख्य रस्ते, उद्याने, मोकळ्या जागा तसेच सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले जाणार असल्याची माहिती नगरसेवक राजू वैद्य यांनी दिली.

या अभियानाची सुरुवात २२ जुलै रोजी सकाळी ९ वाजता शिवाजीनगर येथील राजू वैद्य यांच्या संपर्क कार्यालयापासून भव्य वृक्षदिंडीने होणार आहे. या दिंडीला राज्याचे मंत्री अतुल सावे, माजी महापौर किशोर शितोळे, महापौर समीर राजूरकर, सभापती अनिल मकरिये, गोविंद केंद्रे, दयाताई कैलास गायकवाड, डॉ. सुनिता संजय सोळुंके, मंडळ अध्यक्ष संजय बोराडे, सुवर्णा तुपे, किरण राऊत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

शिवाजीनगर येथून निघणारी ही वृक्षदिंडी रेणुका नगर, सारा राजनगर, एम रॉल्ड सिटी, मयूर टेरेस, एनआरबी कॉलनी मार्गे कारगिल स्मृती उद्यानात पोहोचणार असून तेथे मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाचा समारोप होईल.

**वृक्षारोपणाचे नियोजित स्थळ व वेळापत्रक –**

- नेहरू कॉलेज शेजारील मैदान – सकाळी ८.००
- देवगिरी हिल्स उद्यान – सकाळी ८.१५
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, शिवाजीनगर – सकाळी ८.३०
- शिवाजीनगर ई–सेक्टर उद्यान – सकाळी ८.४५
- संपर्क कार्यालयातून वृक्षदिंडी प्रारंभ – सकाळी ९.००
- रेणुका नगर मुख्य रस्ता – सकाळी ९.३०
- सारा राजनगर – सकाळी १०.००
- मयूर टेरेस, एनआरबी सोसायटी – सकाळी १०.३०
- कालिका माता मंदिरासमोरील मैदान – सकाळी ११.००
- ’हरित शहर’ संकल्पनेला नागरिकांचा **हातभार द्या–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री अतुल सावे यांच्या हरित शहराच्या संकल्पनेला बळ देण्यासाठी प्रभागातील प्रत्येक नागरिकाने आपल्या घरासमोर, सोसायटीत किंवा परिसरात किमान एक तरी वृक्ष लावावा, असे आवाहन नगरसेवक राजू वैद्य यांनी केले आहे. वृक्ष लागवडीसाठी इच्छुक नागरिकांना मोफत रोपे उपलब्ध करून दिली जाणार असून, आवश्यकतेनुसार घरपोचही रोपे दिली जाणार आहेत.

**वृक्षांसाठी संपर्क :**

**राम केकाण – ८६२५८३९९९९**
**देविदास पवार – ९८२३५२२६३१**
**धिरज केंद्रे – ७९७२८१७२९३**

नगरसेवक राजू वैद्य यांनी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन पर्यावरण संवर्धनाच्या या उपक्रमाला यशस्वी करावे, असे आवाहन केले आहे.

# शेंद्रा–बिडकीन ग्रीनफिल्ड महामार्ग : विकासाचा नवा कॉरिडॉर

महाराष्ट्र शासनाने २५ जून २०२६ रोजी राजपत्राद्वारे छत्रपती संभाजीनगर ऊखखउ नोड–१ करमाड–बीडकीन (३२ किमी) आणि बीडकीन–ढोरेगाव (३५.८० किमी) असा एकूण ६७.८० किमी लांबीचा नवीन ग्रीनफिल्ड राज्य महामार्ग (राज्य महामार्ग क्र. ६१३) अधिसूचित केला आहे. या मार्गासाठी छत्रपती संभाजीनगर, गंगापूर आणि पैठण तालुक्यातील ४६ गावांमधील सुमारे ४४० हेक्टर जमीन संपादित केली जाणार आहे. हा महामार्ग केवळ नवीन रस्ता नसून, छत्रपती संभाजीनगरच्या वाहतूक, उद्योग, लॉजिस्टिक्स आणि भविष्यातील शहरी विस्ताराचा पाया ठरू शकतो.

**शहरावरील वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार –** आज मराठवाडा, विदर्भ, जालना, परभणी या भागातून पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली किंवा पश्चिम महाराष्ट्राकडे जाणारी बहुतांश वाहने छत्रपती संभाजीनगर शहर, बीड बायपास, एनएच–५२ आणि वाळूज मार्गे जातात. त्यामुळे शहरातील औद्योगिक आणि नागरी वाहतुकीवर मोठा ताण निर्माण होतो. नवीन ग्रीनफिल्ड महामार्गामुळे ही वाहने शहरात प्रवेश न करता थेट बिडकीनमार्गे पुण्याकडे वळतील. त्यामुळे शहरातील जड वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे.

**वेळ आणि इंधनाची मोठी बचत –** सध्या शेंद्रा किंवा वाळूज औद्योगिक क्षेत्रातून पुण्याकडे जाण्यासाठी शहराच्या बाहेर पडून बीड बायपासमार्गे एनएच–५२ पकडावा लागतो. हे अंतर ६४ किमी असून, या प्रवासाला वाहतुकीनुसार किमान दोन तास लागू शकतात. ग्रीनफिल्ड महामार्ग सुरू झाल्यानंतर शेंद्रा करमाड परिसरातून पुणे महामार्गावर पोहोचण्याचे अंतर सुमारे ६८ किमी असून, हा प्रवास सुमारे एक तासात पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मालवाहतूक, उद्योग आणि प्रवाशांचा वेळ तसेच इंधनाची बचत होईल.

**छत्रपती संभाजीनगरसाठी बाह्य रिंगरोडची भूमिका –** हा महामार्ग प्रत्यक्षात शहरासाठी जींशी ठळपस ठेरव प्रमाणे काम करेल. शेंद्रा, बीडकीन, DMIC आणि AURIC परिसरातून विदर्भ, उत्तर भारत किंवा पूर्व भारताकडे जाणारी वाहने शहरात न येता थेट नवीन मार्ग वापरू शकतील. तसेच जड मालवाहतूक शहराबाहेर राहिल्याने वाहतूक कोंडी, प्रदूषण आणि अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

**उद्योगांसाठी मोठा गेमचेंजर –** शेंद्रा MIDC, ऑरिक शेंद्रा– बिडकीन, वाळूज एमआयडीसी आणि परिसरात मोठ्या प्रमाणावर उद्योग येत आहेत. यामुळे हा शहराचा पूर्व–दक्षिण–पश्चिम परिसर उत्पादन केंद्र म्हणून विकसित होत आहे.

**महामार्गामुळे उद्योगांना मिळणारे फायदे:**

- पुणे व मुंबई बंदरांशी जलद संपर्क
- कंटेनर वाहतुकीचा कमी खर्च
- लॉजिस्टिक्स वेळेत घट
- निर्यातक्षम उद्योगांना चालना
- नवीन वेअरहाऊस आणि लॉजिस्टिक्स पार्क उभारणी

**ओपन अॅक्सेसमुळे रिअल इस्टेटला चालना –** ग्रीनफिल्ड महामार्गाला योग्य ठिकाणी Open Access उपलब्ध झाल्यास महामार्गालगतच्या परिसराचा चेहरामोहरा बदलू शकतो. यामुळे: नवीन निवासी टाउनशिप, व्यावसायिक संकुले, लॉजिस्टिक्स हब, चडचए औद्योगिक पार्क यांसारख्या प्रकल्पांना मोठी चालना मिळू शकते. विशेषतः शेंद्रा–बिडकीन दरम्यानचा पट्टा भविष्यात शहराच्या विस्ताराचा नवा विकास कॉरिडॉर बनू शकतो.

**– निखिल भालेराव**

# राष्ट्रीय राजपूत करनी सेनेच्या राष्ट्रीय सचिवपदी डॉ. जीवन राजपूत यांची नियुक्ती

छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) श्री राष्ट्रीय राजपूत करनी सेनेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत डॉ. जीवन राजपूत यांची राष्ट्रीय सचिव या महत्त्वपूर्ण पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी त्यांनी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत राष्ट्रीय नेतृत्वाने त्यांच्यावर ही नवी जबाबदारी सोपविली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे महाराष्ट्रातील संघटनात्मक कार्याला राष्ट्रीय स्तरावर नवे बळ मिळणार असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.



महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून कार्यरत असताना डॉ. जीवन राजपूत यांनी संघटन विस्तार, समाजहिताचे विविध उपक्रम, युवकांचे संघटन, जनजागृती, समाजातील विविध घटकांमध्ये समन्वय निर्माण करणे तसेच राष्ट्रहिताच्या विषयांवर संघटनेची भूमिका प्रभावीपणे मांडण्याचे काम केले. राज्यभर संघटनेची व्याप्ती वाढविणे, नवीन कार्यकर्त्यांना संधी देणे आणि विविध सामाजिक प्रश्नांवर संघटनेच्या माध्यमातून जनआंदोलन उभारण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

राष्ट्रीय सचिवपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर डॉ. जीवन राजपूत यांनी ही नियुक्ती केवळ वैयक्तिक सन्मान नसून महाराष्ट्रातील प्रत्येक कार्यकर्ता, पदाधिकारी, मातृशक्ती, युवक आणि समाजबांधवांच्या अथक परिश्रमाचे व विश्वासाचे फलित असल्याचे सांगितले. ‘प्रदेशाध्यक्ष म्हणून केलेले कार्य हे सर्वांच्या सहकार्यामुळेच शक्य झाले. राष्ट्रीय नेतृत्वाने माझ्यावर पुन्हा विश्वास ठेवून राष्ट्रीय सचिवपदाची जबाबदारी दिली आहे. हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी मी पूर्ण निष्ठा, प्रामाणिकपणा आणि समर्पणाने कार्य करणार आहे,‘ असे त्यांनी सांगितले.

याचवेळी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदाची धुरा प्रवीणसिंह पाटील यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. त्यांना शुभेच्छा देताना डॉ. जीवन राजपूत यांनी त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात संघटना अधिक व्यापक होईल आणि नव्या उंचीवर पोहोचेल, असा विश्वास व्यक्त केला. संघटनेची विचारधारा, परंपरा आणि समाजहिताची भूमिका अधिक सक्षमपणे पुढे नेण्यासाठी ते प्रभावी नेतृत्व करतील, असेही त्यांनी नमूद केले. राष्ट्रीय सचिव म्हणून देशभरात संघटनेचे कार्य अधिक प्रभावी करण्याचा निर्धार व्यक्त करताना डॉ. जीवन राजपूत म्हणाले की, समाजाची एकजूट, युवक सक्षमीकरण, सामाजिक न्याय, संघटन बळकटीकरण आणि राष्ट्रहिताच्या प्रत्येक अभियानाला अधिक वेग देण्यासाठी ते सातत्याने कार्य करतील. विविध राज्यांतील कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढवून संघटनेचे राष्ट्रीय स्तरावरील कार्य अधिक व्यापक करण्यावर भर दिला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. राष्ट्रीय नेतृत्वाने दाखविलेल्या विश्वासाबद्दल त्यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले. तसेच संघटनेतील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आघाडी, युवा आघाडी आणि समाजातील ज्येष्ठांच्या सहकार्यामुळेच ही वाटचाल शक्य झाल्याचे सांगत भविष्यातही सर्वांना सोबत घेऊन संघटनेचे कार्य अधिक गतिमान करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. डॉ. जीवन राजपूत यांच्या राष्ट्रीय सचिवपदी नियुक्तीचे विविध सामाजिक संघटना, राजपूत समाजातील पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांनी स्वागत केले असून, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी आलेली बँक, मालमत्तेचा ताबा न घेता परत गेली

बीड, दि. २१ (प्रतिनिधी) – मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी आलेली बँक, मालमत्तेचा ताबा न घेता परत गेली. श्री धर्मा बाबासाहेब फाळके व त्यांचे अन्य सहकारी यांनी बँकेकडून घेतलेले कर्ज निधारीत वेळेत परतफेड न झाल्यामुळे सदर थकीत कर्ज खाते एन.पी..ए. मध्ये गेले होते. सदर खात्याची थकीत कर्जाची रक्कम वसुल करण्यासाठी संबधित बँकेने सरफेसी अॅक्ट २००५ कलम १४ अन्वये दिनांक १६/०७/२०२६ रोजी धर्मा बाबासाहेब फाळके यांच्या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेण्यासाठी बँकेतील अधिकारी, पोलिस व अन्य यांना घेऊन सदर अधिकारी हे पंचासमक्ष धर्मा बाबासाहेब फाळके यांचे निवासस्थानी ठिक ११.०० वाजता पोलिस बंदोबस्ता उपस्थित झाले व बँके तर्फे ताबा कार्यवाहीच्या वेळी थकीत कर्जदारातर्फे अॅड. श्री. श्री जोशी निलंगेकर हे स्वतः घटनास्थळी उपस्थित राहुन सरफेसी अॅक्ट २००२/२००५ कलम १४ अन्वये केलेल्या अंमलबजावणीतील काही त्रुटी त्यांनी सर्वांसमक्ष बँकेच्या अधिकाऱ्यांना दाखवुन दिले.

सदर त्रुटीची पुर्तता जो पर्यंत होत नाही तो पर्यंत प्रत्यक्ष जागेचा ताबा घेणे हे सरफेसी अॅक्ट कायद्याच्या चौकटीस बसत नसल्याचे निदर्शणास आणुन दिले व याउपरही प्रत्यक्ष ताबा घेण्याची कार्यवाही बँकेने केल्यास ते चुकीचे ठरेल असे त्यांनी दर्शवुन दिल्यानंतर ताबा घेण्यासाठी आलेल्या बँकेने मुख्य कार्यालयास संपर्क साधुन चर्चा केली व सदर जागेचा ताबा न घेता निघुन गेले. अॅड. श्री. श्री जोशी निलंगेकर हे सरफेसी अॅक्ट व कार्पोरेट लॉ मध्ये कार्यरत असुन त्यांची सरफेसी अॅक्ट वरती पुस्तक स्वतः लिहीलेले आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाचे महाराष्ट्रातही पडसाद, छत्रपती संभाजीनगरातील क्रांती चौकात शेकडो विद्यार्थ्यांचे उत्स्फूर्त आंदोलन

छत्रपती संभाजीनगर दि.२० (प्रतिनिधी)- दिल्लीत क्रॉक्रोच जनता पार्टीने (सीजेपी) सुरू केल ल्या आंदोलनाचे जोरदार पडसाद आज महाराष्ट्रात ठिकठिकाणी उमटले. सीजेपीने आज दिल्लीत संसद भवनावर मोर्चाचे आयोजन केले. या मोर्चात सहभागी होण्यासाठी लाखोंच्या संख्येने तरूणाईचा सागर रस्त्यावर ओसंडून वाहिला. या मोर्चाच्या समर्थनार्थ आज छत्रपती संभाजीनगरातील क्रांती चौकात शेकडो तरूण गोळा झाले आणि त्यांनी जोरदार आंदोलन करत केंद्र सरकारच्या दडपशाहीचा निषेध करत अभिजीत दिपके व सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ जोरदार आंदोलन केले.

सीजेपीच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ पुकारलेल्या क्रांतीचौकातील या आंदोलनात विविध विद्यार्थी संघटना सहभागी झाल्या होत्या. विशेष म्हणजे या






आंदोलनात नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांशिवाय अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, मानव्य विद्याशाखांचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनीही मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

आंदोलनात सहभागी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी कल्पक घोषवाक्य असलेले प्लेसकार्ड हातात घेतले होते. या आंदोलनकांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, ही या आंदोलकांची मुख्य मागणी होती. तरूणांच्या भविष्याशी खेळणारी हुकुमशाही, यासह सरकारविरोधी आणि शिक्षण व्यवस्थेतील अनागोंदीचा निषेध अशा विविध घोषणांचे फलक हातात घेऊन विद्यार्थ्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

दिल्लीतील जंतर-मंतरवर सुरू असलेल्या शांततापूर्ण आंदोलन करणारे पर्यावरणतज्ज्ञ सोनम वांगचुक आणि कॉक्रोच जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांना दिल्ली पोलि सांनी दिलेल्या अमानुष वागणूक दिली. या दडपशाहीचा तीव्र निषेध करत देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लावणाऱ्या नीट पेपरफुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, असा या आंदोलक विद्यार्थ्यांचा आग्रह होता. क्रांती चौकातील आंदोलनात विद्यार्थी-विद्यार्थिनी असे विविध फलक हातात घेऊन सहभागी झाले होते. आज सकाळपासूनच क्रांती चौकात विद्यार्थी जमायला सुरूवात झाली. विविध अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी शिक्षणमंत्री राजीनामा द्या, सोनम वांगचुक यांच्यावरील दडपशाही थांबवा, अशा विविध घोषणा देऊन आंदोलक विद्यार्थ्यांनी क्रांती चौक दणाणून सोडला. अभिजीत दिपके आणि सोनम वांगचुक हे विद्यार्थ्यांसाठी लढत आहेत. मात्र केंद्र सरकार त्यांची दखल घेत नाही. केंद्र सरकारने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा तत्काळ राजीनामा घ्यावा. नीट पेपरफुटीच्या घोटाळ्यामुळे विद्यार्थी आत्महत्या करत आहेत. त्यांचे जीव वाचवण्यासाठी नीट परीक्षेसह शिक्षण व्यवस्थेतील अनागोंदी कारभार थांबवण्यासाठी केंद्र सरकारने पावले उचलावी, असे या विद्यार्थ्यांचे म्हणणे होते. या आंदोलनात विविध विद्यार्थी संघटना, राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि वकील संघटना सहभागी झाल्या होत्या.

# छत्रपती संभाजीनगर जिल्हा बँकेचे अध्यक्षपद शिवसेनेला; आ.विलास भुमरे अध्यक्ष, भाजपचे रामराव शेळके उपाध्यक्ष

छत्रपती संभाजीनगर दि.२० (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अध्यक्षपदी आमदार विलास भुमरे यांची निवड झाली आहे, तर उपाध्यक्षपदी रामराव शेळके यांची निवड झाली आहे. अध्यक्षपदासाठी शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात दोन-दोन-एक वर्षांचा फॉर्म्युल ा निश्चित करण्यात आला आहे. खासदार संदिपान भुमरे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यानुसार, पहिल्या दोन वर्षांसाठी शिवसेनेला अध्यक्षपद



मिळाले आहे. पुढील दोन वर्षे भाजप आणि शेवटच्या एका वर्षासाठी राष्ट्रवादी काँग्रेसला हे पद मिळेल.

अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदाच्या निवडीसाठी सोमवारी जिल्हा मध्यवर्ती बँकेत बैठक झाली. या बैठकीला सर्व संचालक उपस्थित होते. खासदार संदिपान भुमरे, ओबीसी विकास मंत्री अतुल सावे आणि आमदार अब्दुल सत्तार यांनी यावेळी अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या निवडीची घोषणा केली. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अध्यक्षपदासाठी जोरदार चर्चा सुरू होती. दोन्ही पक्षांनी हे पद आपल्याकडे घेण्यासाठी अनेक बैठका घेतल्या होत्या. अखेर शिवसेनेला अध्यक्षपद मिळाले असून, भाजपला उपाध्यक्षपद मिळाले आहे.

### आषाढी एकादशी वाळूज पंढरपूर यात्रा

# 'स्वच्छ वारी'साठी संकल्प करु या-जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.




छत्रपती संभाजीनगर दि.२० (प्रतिनिधी)- वाळूज पंढरपूर येथे आषाढी एकादशीनिमित्त मोठ्या प्रमाणावर भाविक विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी येत असतात. या यात्रेच्या पार्श्वभुमिवर स्वच्छता व सुरक्षा उपाययोजनांना प्राधान्य द्यावे व यंदाची वारी ही स्वच्छ वारी करण्याचा संकल्प करु या,असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज केले.

पंढरपूर येथील यात्रोत्सवाच्या पार्श्वभुमिवर आज जिल्हाधिकारी कार्याल यात पूर्वतयारी आढावा बैठक घेण्यात आली. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम.,पोल ीस उपआयुक्त पंकज अतुल कर, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर, उपप्रादेशीक परिवहन अधिकारी दीपक शिंदे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मारुती मस्के, मंदिर प्रशासनाचे पदाधिकारी, ग्रामपंचायत, अन्न औषध प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क आदी अधिकारी उपस्थित होते.

यात्रोत्सवाच्या दरम्यान येणाऱ्या भाविकांना फराळाचे वाटप करण्यात येते. त्यासाठी १३ ठिकाणी स्टॉ ल्स लावण्यात येणार आहेत. या प्रत्येक स्टॉल्सवर स्वयंसेवक उपलब्ध असावे. तसेच तयार होणारा कचरा संकलनासाठी कचरा कुंडी उपलब्ध असावी. भाविकांनी इतस्ततः टाकलेला कचरा उचलण्यासाठी स्वच्छता स्वयंसेवक, सफाई कर्मचारी यांना नेमण्यात यावे. घंटागाड्यांची उपलब्धता व कचरा संकलन करणाऱ्या वाहनांची उपलब्धता ठेवावी. या ठिकाणी भाविकांची गर्दी पाहता ४ पाळ्यांमध्ये स्वयंसेवक आवश्यक असतील. ८५५ ठिकाणी स्वयंसेवक लागणार आहेत. त्यामुळे एकूण ३४२० स्वयंसेवकांची आवश्यकता आहे. त्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना आदी विद्यार्थी तसेच स्वयंसेवी नागरिकांनी आपली स्वयंसेवक म्हणून सेवा द्यावी,असे आवाहनही करण्यात आले. तसेच यात्रा परिसरात व मंदिरात मिळून ६५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. त्याद्वारे पोलीस यंत्रणा यात्रेवर लक्ष ठेवणार आहे. शिवाय एआय तंत्राचा वापर करुन यात्रेकरुंची संख्याही मोजण्यात येणार असल्याचे उपायुक्त अतुलकर यांनी सांगितले. रहदारी, प्रकाश व्यवस्था, वीज पुरवठा, स्वच्छता, अग्निशमन सेवा, अन्न नमुने तपासणी, आरोग्य पथके आदींच्या उपलब्धतेबाबत तसेच आवश्यक पोलीस बळ पुरविण्याबाबत बैठकीत जिल्हाधिकारी गौडा यांनी निर्देश दिले. यंदाची वारी ही स्वच्छ वारी म्हणून व्हावी यासाठी संकल्प करावा,असे आवाहनही त्यांनी केले.

# सकाळी उद्घाटन झाले सायंकाळी दहा हजाराचा दंड भरावा लागला

## देवळाई चौकात रस्त्यावर कचरा टाकल्याप्रकरणी 'माधव सोलर एनर्जी'वर दहा हजारांचा दंड

छत्रपती संभाजीनगर दि.२० (प्रतिनिधी)- महानगरपालिका सातारा देवळाई चौक परिसरातील 'माधव सोलर एनर्जी' या नवीन दुकानाचे उद्घाटन रविवार, दि. १९ जुलै २०२६ रोजी पार पडले. यासाठी पाहुण्यांना निमंत्रित करण्यात आले होते व त्यांच्या साठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र उद्घाटन कार्यक्रमानंतर चहा-नाश्त्याचा कचरा दुकानासमोरील सार्वजनिक रस्त्यावर टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले.

सातारा परिसरातील घनकचरा व्यवस्थापन विभागाची टीम स्वच्छता पाहणी करत असताना त्यांना ह्या दुकानासमोरील कचरा निदर्शनास आला. या प्रकाराची गंभीर दखल घेत मा. उपायुक्त घनकचरा व्यवस्थापन विभाग श्री. नंदकिशोर भोबे यांच्या आदेशानुसार संबंधित दुकानावर १०,००० इतका दंड आकारण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त श्री. अमोल येडगे सर यांनी सांगितले की स्वच्छता नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध शहर विद्रुप करणाऱ्या विरुद्ध सुरू असल ेल्या कठोर मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असून वेळप्रसंगी त्यांच्यावर गुन्हेही दाखल करण्यात येणार आहे. शहरातील नागरिकांनी व्यवसायिकांनी ओला, सुका व इतर कचऱ्याचे योग्य वर्गीकरण करून तो निर्धारित ठिकाणीच दयावा.

तसेच शहरातील नागरिकांनी कोणत्याही सांस्कृतिक, सामाजिक, खासगी, कौटुंबिक किंवा कोणत्याही प्रकारचे उत्सव कार्यक्रम साजरे करत असताना ते सर्व झिरो वेस्ट इव्हेंट राहतील याची काळजी घ्यावी किंवा हे सर्व कार्यक्रम




पर्यावरण पूरक असावे. छत्रपती संभाजीनगर शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी सर्व नागरिकांनी नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन मनपा आयुक्त यांनी केले.

या कारवाईवेळी स्वच्छता निरीक्षक उमेश खरात, जवान विनोद कदम तसेच नागरिक मित्र पथकाचे गौतम वानखेडे, संतोष नवगिरे आणि रावसाहेब इधाटे उपस्थित होते.

(पान १ वरुन)

## राजधानी दिल्लीत युवकांच्या...

बॅरिकेड्सना हात लावल्यानंतर करंट बसल्याचा गंभीर आरोप केला. या संदर्भात काही पत्रकारांनी पोलिसांना विचारले असता पोलिसांनी त्यावरती कोणतही उत्तर न देता बाजूला व्हा, बाजूला व्हा अशा पद्धतीने उत्तर दिली. त्यामुळे दिल्लीमध्ये दिल्ली पोलिसांची दमनशाही सुरू आहे का? असा सुद्धा प्रश्न उपस्थित झाला आहे.

लेह आणि कारगिलमध्ये हजारो नागरिकांनी रस्त्यावर उतरून धरणे आंदोलन केले. जम्मू आणि हिमाचल प्रदेशातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांनी तीव्र निदर्शने केली. दिल्ली पोलिसांनी सोनम वांगचुक यांना बळजबरीने ताब्यात घेऊन सफदरजंग रुग्णालयात दाखल केल्यानंतर, शेकडो समर्थक व सीजेपी कार्यकर्ते रात्रभर जंतर-मंतरवरच ठाण मांडून होते. आज सकाळी सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली जे. आंगमो आणि सीजेपी संस्थापक अभिजित दीपके यांनी आंदोलनाची सूत्रे हाती घेतली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन दिल्ली पोलिसांनी नवी दिल्ली जिल्ह्यात कलम १६३ (प्रतिबंधात्मक हुकूम) लागू केला आणि हे आंदोलन बेकायदेशीर असल्याचे सांगत परिसर मोकळा करण्याचे आदेश दिले.

संसदेच्या १५० मीटर अंतरावर विद्यार्थी पोहोचले होते. त्या विद्यार्थ्यांवर दिल्ली पोलिसांकडून अमानुष पद्धतीने बळाचा वापर केला गेला. इतकेच नव्हे तर तब्बल ४० ते ५० जणांची डोकी फोडण्यात आली असून अनेकांना रक्तबंबाळ करण्यात आलं आहे. अनेक तरुणांना, विद्यार्थ्यांना रस्त्यावरच पोलिसांकडून बेदम मारहाण करण्यात आली असून अनेकांना गंभीर पद्धतीने मारहाण केली आहे. अनेक तरुणींची सुद्धा डोकी फोडण्यात आली आहे. आंदोलन तीव्र झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील संसदेतून बाहेर पडले. दरम्यान, कॉ करोच जनता पार्टीने ट्वीट करत सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली यांना सुद्धा केसाला धरून खेचल्याचा अत्यंत गंभीर आरोप केला आहे. इतकेच नव्हे तर १२ वर्षांच्या मुलीसह ४० ते ५० जणांची डोकी फोडली, असा गंभीर आरोप कॉँक्रोच जनता पार्टीने ट्वीट करत केला आहे.

जंतर-मंतर आणि मंदी हाऊस मेट्रो स्टेशनजवळ जमलेल्या शेकडो आंदोलकांनी संसदेवर धडक देण्यासाठी चलो संसद मोर्चा सुरू केला. संसद मार्गावर पोलिसांनी उभारलेले मोठे लोखंडी बॅरिकेड्स आंदोलकांनी खेचून पाडले आणि पुढे जाण्याचा प्रयत्न केला. सुरक्षारक्षक आणि पोलिसांनी रायसीना रोड आणि संसद मार्ग पोलीस ठाण्याजवळ आंदोलकांना अडवले. संसदेच्या इमारतीपासून अवघ्या २०० मीटर अंतरावर आंदोलक आणि पोलिसांमध्ये मोठा संघर्ष झाला.

आंदोलन नियंत्रणात आणण्यासाठी दिल्ली पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर बळाचा वापर केला. मंडी हाऊस आणि संसद मार्गावर पुढे सरकणाऱ्या जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला. तसेच रायसीना रोडवर बॅ रिकेड्स तोडणाऱ्या आंदोलकांवर अश्रूधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. यात अनेक विद्यार्थी जखमी झाले. सुरक्षेचा उपाय म्हणून राजीव चौक आणि सेंट्रल सेक्रेटरीएट सह ५ महत्त्वाच्या मेट्रो स्टेशनचे दरवाजे बंद करण्यात आले.

पोलिसांच्या कारवाईदरम्यान सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली आंगमो यांच्यासह इतर आंदोलकांना धक्काबुक्की करण्यात आल्याचा आरोप केला गेला आहे. दरम्यान, आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आणि पोलिसांच्या कारवाईचा निषेध करण्यासाठी विरोधी पक्षांचे अनेक खासदार आणि प्रमुख नागरिक घटनास्थळी पोहोचल्याचे दिसून आले.

## प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्यांना...

तर रात्रंदिवस मेहनत करणाऱ्या निष्पाप तरुणांना! जेव्हा या विद्यार्थ्यांनी शिक्षणातील गोंधळाबाबत रास्त प्रश्न विचारले, तेव्हा त्यांना उत्तरादाखल पोलि सांच्या लाठ्या मिळाल्या. पेपर लीक करणारे गुन्हेगार मोकाट फिरत आहेत आणि देशाचे भवितव्य असणारे विद्यार्थी रस्त्यावर ओढले जात आहेत, मार खात आहेत. हे सरकार केवळ तरुणांना अपयशी ठरवत नसून त्यांच्यावर तुटून पडले आहे.' असा घणाघात राहुल गांधी यांनी केला.

## पुण्यात महाविद्यालयीन तरुणीवर...

प्रवेश घेतला होता. याच ठिकाणी तिची ओळख या प्रकरणातील मुख्य आरोपी फरहान शेख याच्याशी झाली. पुढे या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. मात्र, याच विश्वासाचा आणि मैत्रीचा गैरफायदा घेत फरहानने आपल्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक आरोप या महाविद्यालयीन तरुणीने केला आहे.

पीडित तरुणीने दिलेल्या फिर्यादीनुसार, केवळ एकानेच नव्हे तर या प्रकरणातील चौघांनी मिळून गेल्या वर्षभरापासून विविध ठिकाणी तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केले आहेत. या खळबळजनक घटनेची गंभीर दखल घेत पुणे पोलिसांनी तत्काळ कारवाई केली असून प्रकरणातील चारही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. सध्या पोलिसांकडून या प्रकरणाचा सविस्तर तपास सुरू आहे. मात्र, शिक्षणाचे माहेरघर असलेल्या पुण्यात उघडकीस आलेल्या या धक्कादायक घटनेमुळे सर्वत्र तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

## सरकारी कर्मचाऱ्यांवरील हल्ला...

दिल्या. लेटरहेडचा वापर केवळ समाजहित आणि जनसेवेसाठीच झाला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. ट्रक माफिया, सट्टा, गोहत्या, अंमली पदार्थ किंवा इतर बेकायदेशीर कृत्यांना पाठबळ देण्यासाठी लेटरपॅडचा वापर करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही बावनकुळे यांनी दिला आहे.

नीट आंदोलनावरही त्यांनी भाष्य केले. हे आंदोलन ठोस मुद्द्यांवर आधारित नसून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा मलीन करण्यासाठी जाणीवपूर्वक रचलेले राजकीय षड्यंत्र असल्याचा आरोप त्यांनी केल ा. पेपरफुटी प्रकरणात दोषींवर सरकारने आधीच कठोर कारवाई केली आहे. एखाद्या कर्मचाऱ्याच्या चुकीसाठी संपूर्ण व्यवस्थेला किंवा मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करणे चुकीचे असून, विरोधक केवळ युवकांची दिशाभूल करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

# सोनम वांगचुक आंदोलनाला छत्रपती संभाजीनगरमध्ये पाठिंबा; गांधी पुतळ्यासमोर लाक्षणिक उपोषण

छत्रपती संभाजीनगर दि.२० (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर येथे नीट परीक्षेतील गैरप्रकारांविरोधात आणि पेपरफुटीच्या वाढत्या घटनांविरोधात केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आज गांधी पुतळ्यासमोर लाक्षणिक उपोषण करण्यात आले. प्रख्यात पर्यावरणवादी आणि शिक्षणतज्ञ सोनम वांगचुक हे गेल्या २२ दिवसांपासून दिल्लीत या मुद्द्यावर बेमुदत उपोषण करत आहेत. त्यांना जबरदस्तीने रुग्णालयात दाखल केल्याचा निषेध करत शहरातील नागरिक आणि परिवर्तनवादी संघटनांनी हे उपोषण केले.

उपोषणकर्त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. तसेच, वारंवार होणाऱ्या पेपरफुटीची जबाबदारी निश्चित करून भविष्यात असे प्रकार घडणार नाहीत, यासाठी ठोस व्यवस्था करावी, असे आवाहन केले. देशातील तरुण पिढीच्या भवितव्याशी संबंधित या संवेदनशील प्रश्नावर केंद्र सरकारची निष्क्रिय भूमिका लोकशाहीसाठी आव्हान असल्याचे मत अनेक वक्त्यांनी व्यक्त केले.

सकाळी ९ वाजता या ल ाक्षणिक उपोषणाची सुरुवात झाली. महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास प्रा. विजय पाथ्रीकर आणि प्रा. श्रीराम जाधव यांनी पुष्पहार अर्पण करून उपोषणाला प्रारंभ करण्यात आला.

यावेळी महात्मा गांधी मिशनचे कुलपती अंकुशराव कदम, युवा पत्रकार निरंजन टकले, खासदार कल्याण काळे, शेतकरी नेते साथी अमर हबीब, कष्टकऱ्यांचे नेते साथी सुभाष लोमटे, प्रा. राम बाहेती, टेलिफोन कर्मचारी संघटनेचे साथी रंजन दाणी, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष किरण पाटील डोणगावकर, प्रा. जयदेव डोळे, ॲड. विष्णू ढोबळे, प्रा. मंगल खिंवसरा, प्रा. एच.एम. देसरडा, प्रा. सुभाष महेर, कॉ. भीमराव बनसोड, ॲड. वैशाली डोळस, आवेश भाई, ॲड. अभय टाकसाळ, मेराज सिद्दिकी, प्रा. वैजनाथ राठोड, कॉ. भगवान भोजने आदींनी मार्गदर्शनपर भाषणे दिली.

आजच्या लाक्षणिक उपोषणात कृषितज्ज्ञ त्रिंबक पाथ्रीकर, साथी शेख खुर्रम, प्रा. गीता कोल्हटकर, साथी देविदास किर्तीशाही, साथी सर्जेराव जाधव, ॲड. सचिन गंडले, प्रा. प्रकाश शिरसाट, याहया खान सलीम पाशा, रत्नकला राठोड, सुनीता शिंदे, करुणा गंगावणे, वैशाली शिरसाट, तिलोत्तमा झाडे, इंद्रकुमार जेवरीकर, प्रा. ललिता गादगे, कॉ. श्रीकांत फोप्से, सरस्वती हरकळ, शकुंतला देसरडा, प्रा. प्रकाश दाणे, परशुराम वाखुरे, डॉ. मंजुश्री लांडगे, सिद्धार्थ बनसोड, कॉ. भास्कर लहाने, कॉ. मधुकर खिल्लारे यांचा प्रमुख सहभाग होता.

या प्रकरणी राष्ट्रपतींनी तात्काळ हस्तक्षेप करावा, अशी मागणी करत ल ाक्षणिक उपोषणानंतर विभागीय आयुक्तांमार्फत निवेदन सादर करण्यात आले. मराठवाडा लेबर युनियनचे सरचिटणीस ॲड. सुभाष सावंगीकर यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे प्रस्ताविक व संचालन केले. उपोषणाची सांगता युवक क्रांती दलाचे संस्थापक आणि ज्येष्ठ गांधीवादी डॉ. कुमार सप्तर्षी यांना एक मिनिट स्तब्धता पाळून आदरांजली वाहण्यात आली.